**<u>इटली पासून भारताला काय  शिकता येईल</u>**

इटलीमधील करोनाचा उद्रेक हा निव्वळ योगायोग, किंवा रूग्णांचा वयोगट किंवा इटालियन नागरिकांचा चीन्यांप्रती सहृदय दृष्टिकोन नसुन चीनच्या हातातले खेळणे बनलेले इटलीचे नेतृत्वच यासाठी जबाबदार आहे.चीनने वुहानमधील करोना व्हायरसच्या साथीचा प्रसार व गांभीर्य याबद्दल जगाला अंधारात ठेवल्यामुळे अनेक स्थलांतरीत कामगारांचे चीनला जाणे येणे अनिर्बंध सुरूच होते. 1 फेब्रुवारी 2020 ला फ्लोरेन्सच्या महापौरानी "एका चीन्यास आलिंगन (Hug a Chinese)" मोहिमेचा प्रारंभ केला.4 फेब्रुवारीला प्रसारित झालेला तो व्हिडीओ चीन सरकारने बनवला होता.तो व्हिडीओ https://www.youtube.com/watch?v=mNMdg4morQs या दुव्यावर बघता येईल.

मतपेटीच्या राजकारणासाठी ,जनजागृतीच्या नावाखाली इटालियन शासनानी करोनाच्या गांभीर्याकडे दुर्लक्ष करून इटालीतील लक्षावधी चीनी स्थलांतरीतांपैकी, जे तिथे रहात होते किंवा नुकतेच चीनला जाऊन परतले होते किंवा नुकतेच चीनवरून इटलीत स्थलांतरीत झाले होते, त्यांच्यापैकी कोणा एकालाही आलिंगन देण्यासाठी प्रेरित केले.

**<u>इटालियन ग्रामीण भागातुन विस्थापित चीनी स्थापित</u>**

ट्रेसी बियान्झ हे इटली मधील एक प्रसिद्ध पत्रकार आहेत आणि अनकव्हर डीसीचे संस्थापक संपादक आहेत. प्रस्तुत लेख यांच्या लिखाणावर आधारित आहे.

तीस वर्षांपूर्वी इटलीमध्ये अवैध घुसखोरांच्या प्रश्नाची सुरूवात झाली. इटलीने त्यांच्या शहरं व ग्रामिण भागातील वस्त्रोद्योगामध्ये कमी पगारावर काम करण्यासाठी चीनी लोकांची भरती सुरू केली होती. चीन्यांनी मात्र इटालियन पद्धतीच्या वस्त्रनिर्माणाचे तंत्र फारच झपाट्याने आत्मसात केले व मुळ इटालियन वस्त्रोद्योगाची वाट लावली.'मेड इन इटली'चे लेबल कायम ठेऊन चीन्यांनी इटलीचा वस्त्रोद्योग बळकावला.

इटलीमध्ये हजारो चीनी कामगार चीनमधुन आयात केलेला कच्चा माल वापरून स्वस्त कपडे पादत्राणं व तत्सम उत्पादनं बनवून जगभरात स्वस्त किमतीत विकत. पिढ्या न् पिढ्यांपासुन वस्त्रोद्योग करणाऱ्या इटालियन कुटुंबांना ग्रामीण भागातुन

विस्थापित करून त्या परिसराला चीन्यांनी स्वतःची वसाहतच बनवून टाकले. चीनी कर चुकवेगिरीमध्ये वस्ताद होते. इटालियन लोकांना सर्व प्रकारचे कर व कामगार हिताचे नियम पाळावे लागत असतानाच चीन्यांनी मात्र करचुकवेगिरी करून व कामगारांसंबंधी नियम,कायद्यांना धाब्यावर बसवुन व अवैध मानवी वाहतुक करवुन लवकरच स्वतःचा व्यापार भरभराटीस आणला.

**4.78 बिलीयन डाॅलर्स इटलीहुन चीनमध्ये पाठवले**

2017 मध्ये बँक ऑफ चायनानी त्यांच्या  मिलान येथील शाखेचे धनशोधनाचे (मनी लाँडरिंगचे) एक प्रकरण निस्तरण्यासाठी 600,000 युरोचा दंड भरायचे मान्य केले.फ्लोरेन्स न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करताना चीनच्या चौथ्या मोठ्या बँकेच्या मिलान शाखेच्या चार कर्मचाऱ्यांना अवैध आर्थिक व्यवहारांची सुचना न दिल्याबद्दल दोन वर्षांचा कारावास ठोठावला होता.

फ्लोरेन्स व प्राटोमध्ये रहाणाऱ्या चीन्यांनी 2006 ते 2010 या काळात 4.5 बिलीयन युरोपेक्षाही (4.78 बिलीयन डाॅलर्स) अधिक पैसे  इटलीहुन चीनमध्ये पाठवले.

तपास अधिकाऱ्यांच्या मते चीनला पाठवला गेलेला पैसा हा अवैध मार्गांनी जसे नकली चलन, अफरातफर, अवैध कामगार व कर बुडवेगिरीच्या मार्गाने आला होता. भ्रष्टाचाराचे हे चक्र असेच सुरू राहिले.

**इटली चीनच्या "वन बेल्ट वन रोड" प्रकल्पात सहभागी**

2019 ला जेव्हा "वन बेल्ट, वन रोड" प्रकल्पाची सुरूवात झाली तेव्हा इटलीने चीनसोबत जगाला प्रभावित करणाऱ्या त्यांच्या प्रकल्पात सहभागाची इच्छा दर्शवली. आर्थिक सहकार्याच्या रूपात चीनने उत्तर इटलीचे ट्रिएस्टा बंदर विकसीत करून स्वतः वापर करायला सुरूवात केली.या प्रकल्पामुळे चिनी कच्चा माल व उत्पादनांच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधांमध्ये प्रचंड गुंतवणूक झाली.

कर्जाच्या जीवघेण्या ओझ्याखाली दबलेल्या इटली चीनला होणारी निर्यात वाढवून व चीनी गुंतवणूकीला आकर्षित करून मरगळलेल्या स्वतःच्या अर्थव्यवस्थेत नवीन प्राण फुंकायचे स्वप्न बघत होता.इटली चीनवर अवलंबुन आहे व चीनी भांडवल हे

इटालियन अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. दुर्दैवानी चीनी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या नादात इटलीने स्वतःच्या जनतेला गंभीर संकटात लोटल्याचे दिसते आहे.

आता मानवीय दृष्टिकोनातून मदत करण्याऐवजी चीन इटलीमधली आपली गुंतवणूक सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतोय.चीनमधुन इटलीला जाणाऱ्या प्रचंड मदत व साहित्य सामग्रीच्या पुरवठ्याचे कारण यामुळे स्पष्ट होतंय.

**इटलीमध्येच करोनाचा एवढा उद्रेक का?**

वेगवेगळ्या घटनांमुळे इटलीमध्ये चिनी लोकांची संख्या पुष्कळच वाढली आहे. याशिवाय वेगवेगळ्या कारणा करता इटली मधून चिनी चीनमध्ये जातात आणि तिथून अनेक इटलीमध्ये परत येतात. हे सगळे व्हायरसला इटलीमध्ये पसरवण्यासाठी जबाबदार आहे अर्थात अनेक इटालियन सुद्धा वेगवेगळ्या कारणामुळे चीनमध्ये जात असतात. यांच्या अनिर्बंधित जाण्या येण्यामुळे व्हायरसचा प्रसार झाला.अमेरिके नंतर इटलीमध्ये सर्वात जास्त करोनामुळे मृत्यू झालेले आहे आणि करोना ग्रस्त रुग्णांची संख्या पण आहे. इटलीमध्येआज 24,648 चा मृत्यू व एकूण रुग्ण 1,83,957 (२२-०४०-२०२० पर्यंतची आकडेवारी) आहत.

इटलीमध्ये वृद्धांच्या लोकसंख्याधिक्या सोबतच चीनच्या दबावात असलेले सरकार आहे. त्या सरकारनी चीनच्या दबावाखालीच चीन्यांपासुन सामाजिक अंतर राखण्याच्या प्रयत्नांना खिळ घातली. इटलीतील घटनाक्रमाला समजून घेण्यासाठी खालील गोष्टी बघायला/लक्षात घ्यायला हव्या.

गेल्या काही महिन्यात चीनचा वाढता जागतिक प्रभाव सर्वसामान्यांच्या दृष्टिपथात येत असतानाच अगदी अमेरिकनांनादेखील औषधींसारख्या जीवनावश्यक गोष्टीच्या पुरवठ्यासाठी चीनवरचे अंवलंबित्व जाणवायला लागले आहे. वुहानच्या करोना व्हायरसमुळे चीन्यांच्या गत काही दशकांपासुन  गृहोपयोगी सुविधांद्वारे  नकळत अमेरिका आणि युरोघुसून आपल्या जीवनावश्यक बाबींवर नियंत्रण मिळवण्याच्या कुटील हेतूंची जाणीव आपल्याला होतेय एवढाच एक चांगला परिणाम होय.

**इटलीला  ठेच आणि भारत शहाणा?**

इटलीमध्ये जे घडले त्यापासून भारताला काय शिकता येईल? सर्वात प्रथम इटलीच्या अर्थव्यवस्थेला मदत करण्याकरता तिथे चिनी कारखाने सुरू करायचे असे ठरले .चिनने इटलीमध्ये आर्थिक घुसखोरी करायला सुरुवात केली. स्वस्त मजदूरी करता चिनी नागरिकांना इटलीमध्ये आणण्यात आले. नंतर याचे लोंढा मध्ये रुपांतर झाले.नंतर अजून जास्त प्रमाणामध्ये चिनी नागरिकांनी घुसखोरी केली ,काही घुसखोरी ही कायदेशीर होती आणि बरीचशी घुसखोरी ही बेकायदेशीर होती (तसे बांगलादेशींच्या बाबतीमध्ये भारतामध्ये पडत आहे)त्यामुळे जवळजवळ पुष्कळशी अर्थव्यवस्था ही चिनी ताब्यात गेली .इटलीची अर्थव्यवस्था अजून खालावत होती आणि त्यांच्या वरती असलेले कर्जाचे प्रमाण वाढत होते .म्हणून या इटलीला वाटायला लागले की जर त्यांची अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल तर चिन शिवाय दुसरा कुठलाही पर्याय नाही .एवढेच नव्हे तर चिनने तिथल्या राजकीय पक्षांच्या मध्ये घुसखोरी केली, वर्तमानपत्र आणि मीडिया आणि तथाकथित उदारमतवादी तज्ञांच्या  मनामध्ये सुद्धा घुसखोरी केली, ज्यामुळे इटलीची इटलीची धोरणे चीनला अनुकूल अशी बनवता आली. अर्थातच यामुळे चिनचा अजूनच जास्त आर्थिक फायदा झाला. म्हणजेच या सगळ्यामुळे आणि इटलीच्या चिनी प्रेमी राजकारणामुळे ,उदारमतवादा मुळे चीनचे प्रस्थ इटलीमध्ये प्रचंड वाढले इतके की त्यानंतर त्यावर नियंत्रण करणे हे राज्यकर्त्यांना जवळजवळ अशक्य झाले.
चीन ची आर्थिक ताकद प्रचंड आहे , असाच प्रकार भारतामध्ये सुद्धा केला जाऊ शकतो ,यावरती आपण लक्ष ठेवतो आहे का?  आपण जास्त सावध राहायची गरज आहे .चिनी प्रभाव आपल्या मीडियामध्ये ,तज्ञांच्या मनामध्ये ,राजकीय पक्षांमध्ये घुसखोरी पासून थांबवण्याचे प्रयत्न करणे गरजेचे ,नाहीतर चीन भारताला सुद्धा इटली प्रमाणेच गिळंकृत करण्याचा प्रयत्न करेल.आपली अर्थव्यवस्था इटली पेक्षा पुष्कळ जास्त मोठी आहे म्हणून भारताचा इटली करण्याकरता चीनला पुष्कळ प्रयत्न करावे लागतील .आपण सावध रहायला पाहिजे ,कारण रात्र वैऱ्याची आहे.